■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २९५ ■ रविवार दि.१३ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 295 ■ Sunday Dt.13 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# पालकमंत्री अजित दादा बीड जिल्ह्यात सत्तेतल्या शिवसेनेवर कुरघोडी त्यांनाही द्या निधीची जोडी!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## विकासाच्या नावाखाली केवळ मित्र पक्षाचा महायुतीने खेळ मांडलाय ?

# बीडमध्ये नियोजनात आमदारांना २५ कोटींचा वाटा

## परिषदेच्या आमदारांना १० कोटी, शिवसेना पदाधिकाऱ्यांना मात्र 'वेट ॲण्ड वॉच'

## भाजपच्या वाटणीचे नियोजन पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडेंच्या स्वाधीन!

बीड । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्याचे पालकमंत्रिपद घेतल्यानंतर जिल्ह्यात विकासाच्या मोठ-मोठ्या प्रकल्पांचे नियोजन तर होत आहे, शिवाय जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतही १०० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. मागच्या काळात 'वाटा कमी' अशी ओरड करणाऱ्या आमदारांना पवारांनी भरभरून निधी दिला आहे. सत्ताधारी विधानसभेच्या आमदारांना २५ कोटी व विधान परिषदेच्या आमदारांना १० कोटी रुपयांपर्यंत नियोजनाचा निरोप पवारांच्या कार्यालयातून मिळाला आहे. मित्रपक्ष भाजपच्या वाटणीचे नियोजन पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडेंच्या स्वाधीन करण्यात आले आहे. तर, शिवसेना पदाधिकाऱ्यांना मात्र 'वेट ॲण्ड वॉच' असा निरोप आहे.



महिनाभरापूर्वी २०२५ २०२६ या आर्थिक वर्षाच्या जिल्हा वार्षिक योजनेची बैठक समितीचे अध्यक्ष व पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेत पार पडली. ५७५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मान्यता देण्यात आली. मागील वर्षीच्या तुलनेत आराखडा १०० कोटी रुपयांनी वाढला आहे. विमानतळ, तारांगण, सीट्रिपलआयटी सेंटर अशा नावीन्यपूर्ण प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. प्रकल्प उभारणीच्या दृष्टीने भूसंपादन, पाहणी असे टप्पे होत आहेत. विकासाच्या नावाखाली केवळ कार्यकर्त्यांना मलिदा अशी १० लाख रुपयांच्या कामांचे 'तुकडे' ही पद्धत बंदच्या सूचना अगोदरच पवारांनी अधिकारी व आमदारांना दिल्या आहेत. यासह नावीन्यपूर्णमधून नको त्या कागदोपत्री कामांतून निधी लाटण्याच्या पद्धतीवरही त्यांनी निर्बंध आणले आहेत. आता आमदारांना त्यांच्या कार्यकर्त्यांसाठी द्यावयाच्या कामांचा मार्ग सुरू झाला आहे. सत्तापक्षातील धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, प्रकाश सोळंके, नमिता मुंदडा, सुरेश धस या आमदारांना २५ कोटी रुपयांपर्यंतची कामे सुचविण्याचे निरोप उपमुख्यमंत्री कार्यालयातून मिळाले आहेत. त्यामुळे आमदार मंडळी व त्यांचे कार्यकर्ते खुश आहेत. बीड मतदारसंघात विरोधी पक्षातील संदीप क्षीरसागरांसह डॉ. योगेश क्षीरसागर यांनाही स्वतंत्र निधीचे नियोजन आहे. दरम्यान, या निधीतून आमदारांना शाळा खोल्या दुरुस्ती, बांधकाम, रस्ते, पूल बांधकाम, पुलांची दुरुस्ती, स्मशानभूमी उभारणी अशी कामे सुचवायची आहेत.

### शिवसेना पदाधिकाऱ्यांना निरोप नाही

मराठवाडा शिक्षक मतदारसंघ व मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे सतीश चव्हाण व विक्रम काळे यांनाही पुरेसा निधी यावेळी मिळणार आहे. परिषदेवरील जिल्ह्याशी संबंधित आमदारांना १० कोटी रुपयांचा वाटा राखीव ठेवला आहे. दरम्यान, पूर्वी शिवसेना जिल्हा प्रमुखांना दोन ते तीन कोटी रुपयांपर्यंत वाटा मिळेल. यंदा मात्र पालकमंत्री कार्यालयातून शिवसेना पदाधिकाऱ्यांना निरोप आलेला नसल्याने जिल्हा प्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक व स्वप्निल गलधर श्रेष्ठींकडे मुंबईला गेले आहेत. श्रेष्ठींकडून पालकमंत्र्यांना निधीचा निरोप द्यावा, यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

### भाजपचा अधिकार पंकजा मुंडेंकडे

सत्तेतील मोठा व जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असलेल्या भाजपलाही पुरेसा निधी मिळेल, असे नियोजन करण्यात आले आहे. वाटपाचे नियोजन अधिकार मात्र मंत्री पंकजा मुंडे यांना असतील. त्यांच्या परळीसह जिल्ह्यातील भाजप पदाधिकाऱ्यांचे नियोजन पंकजा मुंडे करतील.

## पोलिस असल्याची बतावणी करून लुटले सोने

बीड । प्रतिनिधी

शहरात पुन्हा एकदा तोतया पोलिसांच्या टोळीने हातचलाखीने सोने लंपास केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना शनिवारी सकाळी गुजराथ कॉलनी परिसरात घडली. बीड शहरातील गुजरात कॉलनी येथे दोन चोरट्याने हातचलाखी करत तीन ते साडे तीन तोळे सोन्याचे दागिने पळवले. ही घटना शनिवारी सकाळी ८:४५ च्या सुमारास घडली. बीड शहर पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड शहरातील गुजरात कॉलनी येथे अल्का सुभाष पगारिया वय ६१ वर्ष यांना आम्ही पोलिस आहोत अशी बतावणी करून अज्ञात दोन चोरट्यांनी त्यांचा विश्वास संपादन करत हातचलाखी करून तीन ते साडे तीन तोळ्यांच्या बांगड्या चोरटे घेऊन गेले. असा एकूण ५५,००० रुपयांचेया प्रकरणा मुळे बीड शहरात गोंधळ उडाला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बीड शहर पोलिस करत आहेत.

## दिंद्रुड मार्केटमधील दोन दुकाने जळाल्याने लाखोंचे नुकसान

दिंद्रुड । प्रतिनिधी

दिंद्रुड मार्केट मधील मेन रोडवर असलेले कपड्यांची दोन दुकाने शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याने जळून खाक झाली. यात दोन्ही दुकानदारांचे लाखोंचे नुकसान झाल्याचे समजते.

दिंद्रुड मार्केटमधील मेन रोडवर असलेले शेख रियाज यांचे रेडिमेट गारमेंट चे तर पद्माकर केंद्रे यांचे टेलरिंगची दुकाने रात्री शॉर्टसर्किटने आग लागल्यामुळे जळून खाक झाले आहेत.आगीने रौद्ररूप धारण केल्यामुळे आग विझविण्याचा प्रयत्न करून देखील दुकानातील



संपूर्ण सामान व मशनरी जळून खाक होत नाहीत तोपर्यंत आग शांत झाली नाही. यात दोन्ही व्यापाऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे. शॉर्टसर्किटमुळे आग लागून दोन्ही व्यापाऱ्यांचे झालेले लाखोंचे नुकसान झाले असून त्यांना मदतीचा हात पुढे करण्याची गरज आहे.

## तक्रार दिल्यावरून महिलेच्या हातावर ब्लेड मारली

केज । प्रतिनिधी

पोलिसात तक्रार दिल्याच्या कारणावरून घरात झोपलेल्या विधवा महिलेस व तिच्या दिर - सासऱ्यास जीवे मारण्याची धमकी देत हातावर ब्लेडने वार केल्याची घटना नारेवाडी (ता. केज) येथे ११ जुलै रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी तिघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

नारेवाडी येथील सोनाली वसंत उगलमुगले (वय २४) ही विधवा महिला ११ जुलै रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास घरात झोपली होती. त्यांचा शेजारी संजिवन उर्फ संजय आश्रुबा उगलमुगले याने त्यांच्या पत्र्याच्या शेडवर दगडे मारून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर त्याने घरात शिरून सोनाली यांच्या अंगावर बसून चापटाने मारहाण केली. तू माझ्या विरोधात पोलिसात तक्रार दिलीस, तुझ्यावर अत्याचार करून तुला मारणार आहे.

तुझ्या दिर व सासऱ्यास मारुन टाकेन, अशी धमकी देत ब्लेडने हाताच्या मनगटावर व दंडावर वार केले. त्यांचा ओरडण्याचा आवाज ऐकून त्यांची जाऊ परिमला अनंत उगलमुगले धावून आल्या. त्यांनी त्याला ओढुन बाजुला करीत गळ्याला धरून कानाखाली मारून ढकलुन दिले. तर त्यांच्या पुतनीला गचुरीला धरून ढकलुन दिल्याने तिच्या डोळ्याच्या बाजूला खरचटले. त्यांच्या सासऱ्याने त्याला तू आमच्या घरी कोणी नसताना बायकांना का त्रास देतोस, म्हणताच त्याने शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली.

त्याचा मुलगा विशाल संजिवन उगलमुगले याने येऊन शिवीगाळ केली. तर अंकुश उगलमुगले याने तुम्हाला जे करायचे ते करा, आम्ही तुम्हाला जिवेच मारणार, रोज कोयते घेऊन येणार असे म्हणत जिवे मारण्याची धमकी दिली. अशी तक्रार सोनाली उगलमुगले यांनी दिल्यावरून संजिवन उर्फ संजय उगलमुगले, विशाल उगलमुगले, अंकुश उगलमुगले या तिघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहाय्यक फौजदार राजू वाघमारे करीत आहेत.

दरम्यान, दुसऱ्या गटाचे संजय उगलमुगले यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांना आश्रुबा उगलमुगले, अनंत उगलमुगले, सोनाली उगलमुगले, करण सांगळे यांनी जुन्या भांडणाचे कारण काढून काठीने डोक्यात मारून जखमी केले. लाथाबुक्यांनी चापटांनी मारहाण करीत जिवे मारण्याची धमकी दिली. अशी तक्रार दिल्यावरून वरील चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## पिस्टल हातात घेऊन सोशल मीडियावर स्टेटस ठेवणाऱ्या चौघांवर गुन्हा

केज । प्रतिनिधी

विनापरवाना आणि धाक निर्माण करण्याच्या उद्देशाने अनाधिकृतपणे पिस्टलसारखे अग्नीशस्त्र हातात घेऊन त्याचे फोटो सोशल मीडिया वरून व्हायरल करणाऱ्या चौघांविरुद्ध केज पोलिसांनी गुन्हा दाखल करीत तिघांना ताब्यात घेतले आहे.

सोशल मीडियाच्या व्हाट्सअप स्टेटसवर पिस्टलसारखे अग्नी शस्त्र हातात घेऊन त्याद्वारे दहशत निर्माण करून धाक बसविण्यासाठी ते फोटो व्हायरल केल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाई केली आहे. जमादार उमेश आघाव यांच्या तक्रारीवरून गणेश अर्जुन मुंडे, रामदास जगन्नाथ मुंडे, पांडुरंग रामा मुंडे (तिघे रा. देवगांव ता. केज जि. बीड), रामचंद्र परसराम ओमासे (रा. बेडा ता. जि. सांगली) या चौघाविरुद्ध केज पोलिसात शस्त्र अधिनियम ३/२५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिस निरीक्षक स्वप्नील



उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक वैभव मांजरमे, जमादार उमेश आघाव, रशीद शेख यांनी गणेश मुंडे, रामदास मुंडे, पांडुरंग मुंडे या तिघांना ताब्यात घेतले आहे. तपास सहाय्यक फौजदार राजू वाघमारे हे करीत आहेत.

### सांगली जिल्ह्यातील घटनास्थळ

या गुन्ह्यात ताब्यात घेतलेल्या तिघांकडे चौकशी केली असता सदर फोटो त्यांनी सांगली जिल्ह्यातून सोशल मीडियावर व्हायरल केले असल्याचे सांगितले. तर या गुन्ह्यातील आरोपी रामचंद्र परसराम ओमासे (रा. बेडा ता. जि. सांगली) याला अद्याप ताब्यात घेतले नसून शस्त्र देखील हस्तगत करण्यात आलेले नाही.

# वाकनाथपुर येथील नालीचे पाणी हनुमान मंदिराच्या समोरुन

बीड । प्रतिनिधी
वाकनाथपुर येथे दलित वस्तीत नालीचे काम झालेले नाही नालीचे काम अर्ध्यावर सोडलेले आहे आणि ज्या नालीचे काम झालेले आहे. त्या नाली सफाईचे काम कोणी करत नाही. पाऊसाळा सुरु होऊन एक महिना झाला तरीदेखील या गावात ग्रामपंचायत मार्फत नाली सफाईचे काम करण्यात आलेले नाही. आता या नालीचे पाणी रस्त्यावरून वाहताना दिसत आहे तरी देखील ग्रामपंचायत नाली सफाई करत नसल्यानें नाल्या तुडुंब भरल्या असल्याने नालीचे पाणी रोडवरून वाहत आहे. नालीत घान असल्याने गावात मच्छराचे प्रमाण खूप वाढलेले आहे.
या गावातली हनुमान मंदिराच्या समोर भुयारी नाली बनविण्यात अली आहे परंतु ही नाली पूर्ण मातीने भरलेली असल्याने नालीचे पाणी नालीच्या वरून हनुमान मंदिराच्या समोरुन वाहत आहे. गावातली नागरीक सकाळी हनुमान मंदिरात दर्शन करण्यासाठी येतात तेव्हा या नालीच्या पाण्यात पाय देऊन जावे लागतो तरी देखील नालेसफाई होत नाही या गावात ग्रामपंचायत मार्फत कोणतेही कामे



होतांना दिसत नाहीत. तेथील सरपंच गावात काय सुरु आहे हे बघण्यासाठी गावात कधी येत नाहीत. येथिल सरपंच फक्त १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवशी राष्ट्रीय ध्वज फडकविन्यासाठी येतात कधी ग्रामसभा घेत नाहीत. कधी गावकऱ्यांना समस्या विचारत नाहीत हे गाव अनेक सुविधांपासून वंचित असल्याचे दिसत आहे. या गावातील दलित वस्तीत नाली झालेली नाही रस्ता झालेला नाही. पिण्याचे पाणी नाही तरी देखील सरपंच कोणाला विचारत नाहीत तरी वरिष्ठ अधिकारी यांनी या गावाला कोणता निधी आला आणि ते कामे पुर्ण झाले का आणि जे कामे झाले ते उत्तम दर्जाचे आहेत का याची पाहणी करुन चौकशी करावी.



# अंबाजोगाईतील देशमुख, लोमटे, इनामदार यांचा काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी
अंबाजोगाई शहरातील खडकपुरा येथील अविनाश लोमटे, राजाभाऊ देशमुख तसेच फ्लॉवर्स क्वार्टर येथील मोहम्मद शफाउद्दीन इनामदार यांनी अंबाजोगाई तालुका काँग्रेस चे अध्यक्ष अभिजीत लोमटे व शहराध्यक्ष असेफोद्दीन खतीब यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.
सर्वसामान्य घरातील युवक अभिजीत लोमटे हे काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी मिळताच अंबाजोगाई शहर व तालुक्यातील युवकांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे त्यामुळे युवक वर्ग मोठया प्रमाणात काँग्रेस पक्षाकडे वळताना दिसत आहे. अविनाश लोमटे, राजाभाऊ देशमूख, इनामदार हे सातत्याने सामाजिक चळवळीत पुढे असतात अद्यापपर्यंत कोणत्याही पक्षाशी निगडित नसलेले हे युवक लोमटे खतीब प्रामुख्याने काँग्रेस ची ताकत वाढवण्यासाठी काँग्रेस मध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

# भाजपच्या राज्य परिषद सदस्यपदी सतीश मुंडे यांची नियुक्ती

परळी । प्रतिनिधी
राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतम ताई मुंडे यांचे विश्वासू भाजपाचे माझी परळी तालुका अध्यक्ष सतीश मुंडे यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री ना. पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतम मुंडे यांचे सतीश मुंडे यांनी आभार मानले आहेत. दरम्यान मंत्री पंकजाताई मुंडे व मा.खा. डॉ.प्रीतम मुंडे यांनी जो आपल्यावर विश्वास टाकला आहे तो सार्थक करून दाखवू, असे प्रतिपादन नवनियुक्त सदस्य सतीश मुंडे यांनी केले.
गेल्या पाच वर्षात तालुकाध्यक्ष पद सक्षमपणे सांभाळले आहे. अनेक अडचणीच्या काळातही त्यांनी आपली भूमिका चौक पणे सांभाळली आहे. पंकजाताई मुंडे व डॉ. प्रीतम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी पक्षाचे शहर व ग्रामीण भागात कसोटीने पक्ष वाढीसाठी प्रयत्न केले. भाजप पक्षाच्या



विचारधारा प्रत्येकाच्या घराघरात पोचविण्याचे काम केले. पंकजाताई मुंडे व डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या कार्यप्रणाली वर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टी बळकट करण्यासाठी प्रयत्न केला. त्यांच्या याच प्रक्षेनिष्ठेची पावतीच म्हणून व त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन सतीश मुंडे यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्य पदी नियुक्ती केली आहे. तसेच सतीश मुंडे, ना.पंकजाताई मुंडे व मा.खा. डॉक्टर प्रीतम मुंडे यांचे अत्यंत विश्वासू असून यापूर्वी परळी पंचायत समिती सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.
परळी तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीचेही अध्यक्ष होते. सतीश मुंडे यांनी भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल परळी वैजनाथ सह बीड जिल्ह्यातून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच सर्वच क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या वतीने अभिनंदनचा वर्ष होत आहे. ना.पंकजाताई मुडे आणि मा.खा.प्रीतम ताई मुंडे यांनी भाजपाच्या राज्य परिषद निवड करून माझ्यावर खूप मोठा विश्वास टाकला आहे. त्यांचा विश्वास सार्थ करून दाखवून भाजपाचे काम वाढविणार असल्याचे सांगून त्यानी टाकलेला विश्वास सार्थ करून दाखवू, असे प्रतिपादन सतीश मुंडे यांनी केले. भाजपाच्या राज्य परिषद सदस्यपदी सतीश मुंडे यांच्या नियुक्ती बद्दल परळी मतदारसंघातील प्रत्येक गावात या निवडीचे स्वागत करण्यात आले.


# मांजरा प्रकल्पात अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध करावा

## आमदार नमिता मुंदडा यांनी सभागृहात केल्या आग्रही मागण्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी
केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. नमिता मुंदडा यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात मांजरा धरण प्रकल्पासाठी अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध करून देण्याची जोरदार मागणी केली. त्यांनी सभागृहात मुद्देसूद भाषण करत या प्रकल्पाच्या सध्याच्या मर्यादा आणि ग्रामीण भागातील पाण्याच्या तुटवड्यावर लक्ष वेधले.
मांजरा प्रकल्पातून सध्या ६०.७५ दलघमी पाणी पिण्याच्या व औद्योगिक गरजांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. हे पाणी लातूर, अंबाजोगाई, केज, कळंब आणि आसपासच्या गावांसाठी वापरले जाते. मात्र, या धरणात १०० दलघमी क्षमतेचा तुटवडा भासत आहे. सिंचनाच्या उद्दिष्टापैकी केवळ ३,००० ते ३,५०० हेक्टर क्षेत्रालाच कालव्यांद्वारे पाणी मिळते, जे की एकूण



११,८८८ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत अत्यल्प आहे.
आमदार नमिता मुंदडा यांनी १४ ऑक्टोबर २०२१ च्या शासन निर्णयाचा संदर्भ देत सांगितले की, गोदावरी खोऱ्यातून १९.२९ ढचउ पाणी दुसऱ्या प्रकल्पात वळवण्यास मान्यता दिली गेली आहे. यामधून मांजरा प्रकल्पासाठी २ ते ३ ढचउ पाणी वळवणे अत्यंत आवश्यक आहे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. त्यांनी अधिक पुढे सांगितले की, केज मतदारसंघात उसतोड मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. संपूर्ण गावे दरवर्षी उसतोडीसाठी स्थलांतरित होतात. या भागातील २० ठिकाणी साठवण तलावांची तातडीने गरज आहे. गोदावरी खोऱ्यातून पाणी उपलब्ध करून, त्यातूनच पावसाळ्यात नदीतून पाणी लिफ्ट करून मांजरा प्रकल्पात आणता येईल, अशी अभिनव कल्पना त्यांनी मांडली.
तसेच, बुटेनाथ साठवण तलावाच्या बाबतीत अद्याप पाणी उपलब्धतेचा दाखला मिळालेला नाही, त्यामुळे यासाठी त्वरित अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मंजुरी घेणे आणि सर्वेक्षणाची प्रक्रिया सुरू करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या मुद्द्याला उत्तर देताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी, मांजरा प्रकल्पात उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी उपलब्ध करून देता येईल का, याची माहिती घेण्यात येईल. तसेच बुटेनाथ तलावासंदर्भात स्वतंत्र बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन सभागृहात दिले.
केज मतदारसंघातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी आमदार नमिता मुंदडा यांनी केलेली ही ठोस आणि अभ्यासपूर्ण मागणी, ग्रामीण भागातील जलसुरक्षेसाठी महत्त्वाची ठरणार आहे.



दंगल सम्राट राजकुमार (भैय्या) गुरखुदे आपणास वाढदिवसाच्या खुप खुप शुभेच्छा देताना प्रमोद ठोंबरे माळापुरी.

# मानवी हक्क अभियान च्या इशारा मोर्चाला हजारोच्या संख्येने उपस्थित राहा : अजय भिसे

माजलगाव । प्रतिनिधी
उपविभागीय कार्यालय माजलगांव या ठिकाणी



दि,१४ जुलै वार सोमवार ठीक १२:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते उपविभागीय कार्यालय असा मानवी हक्क अभियान च्या वतीने इशारा मोर्चा होणार आहे. विविध मागण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून या मोर्चाचे नेतृत्व राजेश भाऊ क्षीरसागर हे करणार आहेत. या मोर्चाला माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान अजय भिसे यांनी केले आहे.

# गजानन विद्यालयाचा वर्धापन दिन साजरा

नवगण राजुरी । प्रतिनिधी
येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा ७० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रशांत पवळ हे होते. आदर्श शिक्षण संस्था संचालित गजानन माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय राजुरी नवगण ता.जि.बीड येथे दि.१२ जुलै १९५५ रोजी लोकनेत्या स्व. केशरकाकू व सोनाजीराव क्षीरसागर यांनी गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली.



त्यानिमित्त शनिवारी ७० वा वर्धापन दिन विद्यालयामध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना काकूंचा गावचे सरपंच ते खासदार पदापर्यंतचा संघर्षमय प्रवास कसा गेला व सर्व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची गंगा आपल्या दारापर्यंत कशी पोहोचवली हे प्राचार्य पवळ यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी शाळेचे उपमुख्याध्यापक शिंदे.एस.एस पर्यवेक्षक, दगडे व्ही.एन, शेख. एस.वाय, भोसले बी.एस., सौ. संगीता शिंदे व सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदीप सरवदे यांनी केले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# चोरीच्या तयारीत असलेल्या तरुणास घेतले ताब्यात

केज । प्रतिनिधी
केज शहरातील बसस्थानकावर रात्रीच्या वेळी चोरीच्या उद्देशाने तोंडाला बांधून फिरणाऱ्या तरुणास गस्त घालणाऱ्या पथकाने जेरबंद केले. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.
केज ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे, फौजदार उमेश निकम, जमादार बाळासाहेब अहंकारे हे १० जुलै रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास गस्त घालत असताना जुबेर ऊर्फ मारी मुस्ताक फारूकी (रा. रोजा मोहल्ला, केज) हा बसस्थानकात अंधारात चेहरा झाकून चोरीच्या उद्देशाने फिरत होता. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीचे उत्तर दिले. जमादार बाळासाहेब अहंकारे यांच्या तक्रारीवरून जुबेर ऊर्फ मारी फारूकी याच्याविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार हनुमान मुंडे हे करीत आहेत.

# उपमुख्यमंत्री अजित पवार व धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त अंबाजोगाई शहरात सेवा सप्ताहाचे आयोजन

## राजकिशोर मोदी व राजेश्वर चव्हाण यांच्या पुढाकाराने १५ ते २२ जुलै दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी
महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ना अजितदादा पवार तसेच राज्याचे माजी कृषीमंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी तसेच जिल्हाध्यक्ष ऍड राजेश्वर चव्हाण यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने अंबाजोगाई शहरात १५ जुलै ते २२ जुलै २०२५ या कालावधीत सेवा सप्ताहाचे भव्य असे आयोजन करण्यात आले आहे. हा सेवा सप्ताह राज्याचे उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा करण्यात येणार असून सात दिवस सात उपक्रम या संकल्पनेवर आधारित सामाजिक कार्यक्रमांची मालिका राबवण्यात येणार आहे.
राजकिशोर मोदी व राजेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या सप्ताहात आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता, शिक्षण व जनजागृती यांसारख्या विविध विषयावर आधारित हे समाजोपयोगी उपक्रम राबवले जाणार आहेत. समाजातील प्रत्येक घटकाला स्पर्श करणाऱ्या या उपक्रमांमुळे अंबाजोगाईमध्ये सेवाभावाची सकारात्मक अशी लाट निर्माण होणार आहे. रक्तदान शिबिराने सेवा सप्ताहाचा शुभारंभ मंगळवार १५ जुलै रोजी युवा वर्गामध्ये समाजसेवेची जाणीव निर्माण व्हावी, तसेच गरजू रुग्णांना तातडीने रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करून या सप्ताहाचा शुभारंभ होणार आहे. या रक्तदान शिबिरात अनेक तरुण स्वयंसेवक सहभाग नोंदवणार आहेत. बुधवार दि १६ रोजी पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या उद्देशाने वृक्षारोपण मोहीम राबवली जाणार असून यात सार्वजनिक जागांमध्ये व शासकीय परिसरात विविध प्रकारची झाडे लावण्यात येणार आहेत.



गुरुवार दि १७ रोजी अंबाजोगाई बसस्थानक परिसरात स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे. शहराच्या स्वच्छता व सौंदर्यात भर घालणाऱ्या या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मोदी व चव्हाण यांनी केले आहे. शुक्रवार दि १८ जुलै रोजी गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. यासाठी शहरातील शाळा व संस्थांशी समन्वय साधून तेथील विद्यार्थ्यांना सदर शैक्षणिक मदत पोहोचवली जाणार आहे. शनिवार दि १९ जुलै रोजी प्लास्टिक मुक्त अंबाजोगाईसाठी जनजागृती मोहिम राबवण्यात येणार आहे. याद्वारे पर्यावरण पूरक जीवनशैलीचा अंगीकार करण्याचे संदेश या माध्यमातून समस्त नागरिकांस दिले जाणार आहे. दि २० रोजी श्री योगेश्वरी मंदिर परिसरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना मोफत महाप्रसादद्वारे अन्नदान करण्यात येणार आहे. सोमवार दि २२ जुलै रोजी तुमचं मत, माझं कर्तव्य ही नाविन्यपूर्ण अशी संकल्पना राबविण्यात येणार आहे. या संकल्पनेतून नागरिकांच्या गरजा, त्यांच्या तक्रारी व नागरिकांच्या प्रलंबित मागण्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी एक विशेष जनसंपर्क उपक्रम राबवला जाणार आहे. प्रत्येक वयोगटातील नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा आणि त्या मार्गी लावण्याचा प्रयत्न या उपक्रमाद्वारे केला जाणार आहे.
या संपूर्ण सप्ताहात राजकिशोर मोदी (प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस) तसेच ॲड. राजेश्वर चव्हाण (जिल्हाध्यक्ष रा का पार्टी) यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली सेवा सप्ताह या अंतर्गत विविध विधायक उपक्रम यशस्वीपणे संपन्न होणार आहेत. त्यांच्या नेतृत्वात यापूर्वीही अनेक विविध सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक उपक्रम यशस्वी पणे राबवण्यात आले असून याद्वारे शहर व परिसरात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत.
या सेवा सप्ताहाचे उद्दिष्ट केवळ कार्यक्रम राबवणे नसून येथील युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करणे, नागरिकांच्या गरजा समजून घेणे आणि पर्यावरणपुरक स्वच्छ, शिक्षित आणि आरोग्यदायी समाजनिर्मितीकडे वाटचाल करणे हे आहे. सेवा सप्ताहाच्या निमित्ताने अंबाजोगाई शहर व परिसरात लोकसहभागातून परिवर्तनाचा नवा अध्याय सुरू होण्यास प्रेरणा मिळणार आहे.

# युवा नेते रणवीर पंडित विवाहबंधनाच्या वाटेवर!

## साखरपुडा सोहळा जल्लोषात; अनेक मान्यवरांची उपस्थिती

गेवराई । प्रतिनिधी
माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे चिरंजीव रणवीर पंडित यांचा साखरपुडा आज रविवार, (दि.१३) रोजी समारंभ अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात छत्रपती संभाजीनगर येथे पार पडला. या सोहळ्याला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.
पंडित कुटुंबीयांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात पारंपरिक संस्कृतीचा आविष्कार दिसून आला. नवदाम्पत्याला शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या पाहुण्यांचे विशेष स्वागत करण्यात आले. रणवीर पंडित आणि त्यांच्या होणाऱ्या वधूने एकत्रितपणे साखरपुड्याचा विधी पार पाडला, आणि दोन्ही कुटुंबांमध्ये नव्या नात्याचा एक सुंदर क्षण साजरा झाला.



कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पंडित कुटुंबीयांचे विशेष कौतुक होत आहे. रणवीर पंडित यांना पुढील आयुष्याच्या नव्या पर्वासाठी अनेक मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला.हा सोहळा फक्त एका कुटुंबाचा नव्हे, तर अमरसिंह पंडित यांच्या विश्वासू कार्यकर्त्यांसाठीही एक आनंदाचा क्षण ठरला.
या कार्यक्रमासाठी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे पाटील, खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आ. सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. विलास बापू भुमरे, आ. राहुल पाटील, आ. राजेश विटेकर, माजी आमदार राजन पाटील, बाळासाहेब आजबे, दीपक आबा सोळुंके, जयवंत जाधव, प्रसादजी तनपुरे, राधाकृष्ण होके पाटील, रमेशराव आडसकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# शेतकरी कष्टकऱ्याच्या न्यायहक्कासाठी काँग्रेस कटिबद्ध : गणेश बजगुडे पाटील

## तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वात बीड तालुक्यात काँग्रेसच्या गाव तिथे शाखा अभियानास सुरुवात

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असताना काँग्रेस पक्ष स्वबळाचा नारा देत बीड तालुक्यात पक्ष संघटन मजबुत करण्यासाठी तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज बीड तालुक्यात मंजेरी हवेली, बाबामिया इनामदार नगर, तेलगाव रोड येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या शाखेचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी योगेश गंगाराम बहिरवाल, राजु मुसा शेख, रिजवान पठाण, रेवण खटाने, राजेंद्र घोशीर, संतोष बेदरे, इरफान इनामदार, मोहसीन सय्यद, अमीर इनामदार, आरशान इनामदार यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी शेख कादर बाबामिया इनामदार यांची बीड तालुका उपाध्यक्ष पदी फेर निवड करण्यात आली असुन त्याच बरोबर पाली सर्कल प्रमुख पदी योगेश गंगाराम बहिरवाल यांची निवड करण्यात आली.




गणेश बजगुडे पाटील यांचा राजकीय अनुभव, संघटनात्मक कौशल्य व तालुक्यातील वाडी वस्ती तांड्यापर्यंत असलेला प्रत्यक्ष लोकसंपर्क यामुळे तालुक्यात काँग्रेस पक्षाला पुन्हा एकदा नवसंजीवनी निर्माण होवुन येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार विजयी होऊ शकतो. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे म्हणाले की, बीड जिल्हा हा काँग्रेस विचाराचा जिल्हा असुन बीड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचा मोठा मतदार आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत आघाडीचे उमेदवार विजयी करण्यात काँग्रेसचा मोठा वाटा आहे परंतु आघाडीच्या राजकारणात काँग्रेसला नेहमीच दुय्यम स्थान मिळाले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्ष स्वतंत्र निवडणूक लढवणार असुन सर्वसामान्य कार्यकर्त्यांना लढण्याची संधी व बळ दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील म्हणाले की, बीड तालुक्यात काँग्रेसने अनेकाना मोठे केले परंतु ते स्वतःच्या स्वार्थासाठी पक्ष सोडून गेले परंतु जनता मात्र आजही काँग्रेस सोबत आहे. सर्वसामान्य शेतकरी, कष्टकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी काँग्रेस पक्ष व आम्ही सर्व कटिबद्ध असुन येणाऱ्या काळात जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने काँग्रेस पक्ष बीड तालुक्यात पुन्हा मजबुत दिसेल असेही ते म्हणाले यावेळी बीड तालुक्यातील मंजेरी हवेली, तेलगाव रोड येथील बाबामिया इनामदार नगर याठिकाणी शाखेचे उद्घाटन करुन गाव तिथे शाखा अभियानास सुरुवात करण्यात आली. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे, तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, सरपंच संतोष सोनवणे, तालुका उपाध्यक्ष शेख कादर बाबामिया इनामदार, पाली सर्कल प्रमुख योगेश बहिरवाल, मंजेरी हवेली शाखा प्रमुख राजु शेख, उपाध्यक्ष रेवण खटाने, सचिव बाबासाहेब बहिरवाल, सहसचिव रिजवान पठाण, कोषाध्यक्ष राजेंद्र घोषिर, संघटक संतोष बेदरे, बाबामिया इनामदार नगर शाखेचे अध्यक्ष इरफान इनामदार, उपाध्यक्ष मोहसीन सय्यद, सचिव अमीर इनामदार, सहसचिव आरशान इनामदार, यांच्यासह रणजीत शेळके, भैय्या गोरे, ओम नवले आदी उपस्थित होते.



## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या बीड जिल्हा युवक कार्याध्यक्ष पदी ॲड.प्रशांत पवार यांची नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

आगामी नगरपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या होणाऱ्या निवडणुका लक्षात घेता सर्व पक्षाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यात बीड जिल्ह्यात युवकांचे मोठे संघटन असणारे ॲड.प्रशांत पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्ष पदी युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांनी नियुक्ती करत जिल्ह्यात युवकांचे मोठे संघटन उभा केले आहे.

ॲड.प्रशांत पवार यांनी लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये निष्ठावंत म्हणून उल्लेखनीय काम केल्याबद्दल त्यांच्या कामाची पावती म्हणून तसेच युवकांचे संघटन व तालुक्यातील युवकांची मोठी बांधणी पाहून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, तथा युवकांचे प्रदेशाध्यक्ष महबूब भाई शेख यांनी जिल्ह्याचे नेतृत्व करण्याची संधी दिली असल्याचे बोलले जात आहे. बीड जिल्हा युवक कार्याध्यक्ष पदी नियुक्ती केल्याबद्दल खा.शरदचंद्रजी पवार, सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील, खासदार बजरंग (बप्पा) सोनवणे, मा.आमदार पृथ्वीराज साठे, डॉ.नरेंद्र काळे, राजेभाऊ फड, व्यंकटेशजी चामणर, अमर (भैय्या) देशमुख, अंकुशरावजी ढोबळे या सर्वांचे आभार मानले आहेत.

येणाऱ्या काळात शिव, शाहू, फुले, आंबेडकर, आण्णाभाऊ यांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी व शरदचंद्रजी पवार यांचे विचार युवकांपर्यंत पोहचवण्याचे काम प्रामाणिकपणे करत राहील.

–ॲड.प्रशांत पवार

# मनाचा मोठेपणा दाखवून मुंडे बंधू भगिनींनी राजाभैय्या पांडे यांना संधी द्यावी : कैलास कावरे

सिरसाळा । प्रतिनिधी

वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड परळी वैजनाथ च्या संचालक मंडळाच्या निवडणुकीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या आदेशाने संसदरत्न खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळक, तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राजा पांडे यांनी आपला उमेदवारी अर्ज वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीत शिवसेनेकडून सर्वसाधारण गटातून अर्ज दाखल केला असून एकमेव शिवसेना उमेदवार राजा भैय्या पांडे हे आहेत. मुंडे बंधू भगिनींनी मनाचा मोठेपणा दाखवून वैद्यनाथ संचालक मंडळ वर काम करण्यासाठी संधी द्यावी असे आवाहन शिवसेना नेते तथा सर्कल प्रमुख कैलास कावरे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.



दिलेल्या प्रसिद्धी पत्रकार कैलास काळे यांनी म्हटले आहे की, राज्यात महायुतीचे सरकार असून जनतेच्या सेवेसाठी महायुती सरकार अत्यंत चांगल्या पद्धतीने काम करत असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीमध्ये पूर्ण महाराष्ट्रात महायुती म्हणूनच सर्व स्थानिक पातळीवरच्या निवडणुका या महायुतीमधूनच निवडणूक लढवल्या जाणारा असून त्याचाच एक भाग म्हणून परळीच्या वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेतर्फे सर्वसाधारण गटातून शिवसेनेचे एकमेव असलेल्या उमेदवार राजाभय्या पांडे यांना संचालक मंडळावर काम करण्यासाठी संधी उपलब्ध करून द्यावी यामुळे स्थानिक पातळीवरच्या कार्यकर्त्यांना काम करण्यासाठी बळ मिळेल परळी मतदारसंघातल्या प्रत्येक निवडणुकीत गेल्या अनेक निवडणूक मध्ये शिवसेनेने मुंडे बंधू भगिनी यांना खांद्याला खांदा लावून काम केलेले आहे. प्रत्येक निवडणुकीत सहकार्य केलेल आहे. राजाभय्यांना संधी दिल्यास महायुतीच्या सर्व स्थानिक नेत्यांना मुंडे बंधू भगिनी बदल सहानभूती राहील एक उत्साहाचा वातावरण शिवसेनेकांमध्ये सुध्या राहील थोड्याच दिवसावर येऊन ठेपलेल्या स्थानिक पातळीवरच्या सर्व निवडणुकीमध्ये शिवसैनिक महायुतीच्या उमेदवारांसाठी खांद्याला खांदा लावून सर्व उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतील. त्यामुळे राज्याच्या पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे व माजी कृषी मंत्री तथा परळी मतदारसंघाचे विद्यमान आमदार धनंजय मुंडे साहेब यांनी शिवसेनेसाठी मनाचा मोठेपणा दाखवा व संचालक मंडळावर शिवसेनेतर्फे एकमेव उमेदवारी अर्ज भरलेले राजाभय्या पांडे यांना संधी उपलब्ध करून द्यावी असे शिवसेना नेते तथा सर्कलप्रमुख कैलास कावरे यांनी पत्रकात म्हटले आहे.

## गायराण जमिनीच्या हक्कासाठी मानवी हक्क मोर्चासाठी मोठया संख्येने यावे : विष्णू मुजमुले

वडवणी । प्रतिनिधी

माजलगांव येथील उपविभागीय कार्यालयावर मानवी हक्क अभियानच्या वतीने मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.



दि .१४ जुलै २०२५ रोजी गायरान जमिनी नावे करा आनुसुचित जातीचे आरक्षण वर्गीकरण अ.ब.क.ड. करा आर्टी बार्टीला भरीव निधी उपल्बध करा. उसतोड कामगार यांना विम्याचे सरंक्षण द्यावे घरकुलसाठी असणारी रक्कम ५ लाख रू करावी निराधार महिलांना ६००० रू. अर्थ साहाय्यची तरतुद करावी, समाजिक विकासाची आसणारे अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ महात्माफुले विकास महामंडळ वसंतराव नाईक महामंडळ यांना ठोस असे भरिव अर्थिक तरतुद करण्यात यावी. विद्यार्थ्यांना शिष्यवृती देन्यात यावी आशा मागण्यासाठी माजलगाव उपविभागीय कार्यालयावर १४ जुलै रोजी मानवी हक्क आभियानच्या वतीने मोर्चा काढण्यात येणार आहे, तरी या मोर्चा मध्ये सहभागी व्हावे असे आव्हान मानवी हक्क अभियान वडवणी तालूकाध्यक्ष विष्णू बप्पा मुजमुले यांनी केले आहे.

## दिल्ली येथे साजरी होत असलेल्या अण्णाभाऊ साठे जयंती अध्यक्षपदी विनोद धर्मू जाधव यांची निवड

बीड । प्रतिनिधी

लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती नवी दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदन येथे उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय समाज कार्य करत असलेले समाज सेवक, समाज सेविका, विविध कला क्षेत्रात कार्य करणाऱ्या कलावंताचा लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार समितीच्या वतीने देण्यात येणार आहे.



या जयंतीसाठी श्री पंचदशनाम जुना अखाडाचे महंत थानापती स्वामी आनंदेश्वरानंद गिरी महाराज जी भारत सरकारचे केंद्रीय मंत्री तसेच सामाजिक समरसता मंच चे निलेश गदरेसह बरेच प्रमुख पाहुणे उपस्थित असणार आहेत. गेल्या ५ वर्षापासुन अण्णाभाऊ साठे यांची जयंती दिल्ली येथे लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती नवी दिल्ली च्या वतीने साजरी केली जाते. या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजक काकासाहेब मोरे, उपाध्यक्ष कमलेश गायकवाड, महिला संपर्क प्रमुख कल्पना गायकवाड, कार्यसमिती मध्ये प्रकाश कांबळे, विभागीय संपर्क प्रमुख युवा समाजसेवक सुरज शिंदे यांची निवड करण्यात आली आहें.

## सर्व तीर्थक्षेत्राचे माहेर श्रीक्षेत्र पंढरपूर आहे : अंगद मोरे

बीड । प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्ष देवशयनी आषाढी एकादशी निमित्त दि.६ रविवार रोजी श्री संत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप आयोजित हरिकीर्तन सेवे प्रसंगी ह.भ.प. अंगद महाराज मोरे म्हणाले सर्व जगातील तीर्थ क्षेत्रामध्ये मानवी जीवाच्या उद्धारासाठी एकमेव असे व सर्व तीर्थ श्रेत्राचे माहेर क्षेत्र पंढरपूर आहे असे म्हटले.या किर्तन सेवेसाठी संत शिरोमणी तुकाराम महाराजांचा क्षेत्र पर प्रकरणातील चार चरणाचा अभंग घेतला.

उदंड पाहिले उदंड ऐकिले/ उदंड वर्णिले क्षेत्र मोहिमे//१// ऐशी चंद्रभागा ऐसे भीमातीर/ ऐसा विटेवर देव कोठे/२//या अभंगावर बोलताना महाराजांनी भक्तीचे प्रकार, क्षेत्रांचे प्रकार, तीर्थ व त्यांचे प्रकार, त्यांचे महत्त्व व श्रेष्ठत्व आणि त्यामध्ये पंढरी क्षेत्राचे महत्त्व यासाठी जगद्गुरु तुकाराम महाराज, नामदेव महाराज, एकनाथ महाराज, ज्ञानेश्वर माऊली, यांच्या अभंगवाणी प्रमाणाने महत्त्व पटवून दिले. पंढरीच्या प्रत्येक ठिकाणचे महत्त्व व उद्धाराचे मार्ग महाराजांनी सविस्तर सांगितले. तुका म्हणे जन्मा आल्याचे सार्थक/ विठ्ठल ची एक देख लिया//अन्य तीर्थाचे महत्त्व जरी असले तरी तेथील नियम कठीण आहे जसे काशीमध्ये उद्धारासाठी देह सोडावा लागतो. पंढरीक्षेत्रामध्ये मात्र वेगळे आहे. ऐका पंढरीचे महिमान/ राऊळ तितके प्रमाण/ तेथील तृण आणि पाषाण तेही देव मानावे/मानवासाठी अहंकार रहित जीवन जेथे होते ती पंढरी.पंढरीच्या लोका नाही अभिमान/ पाया पडे जन एकमेका// आणि अहंकार रहित जीवन झाले की मोक्ष ठरलेला आहे, असे कीर्तन सेवा प्रसंगी सांगितले. यावेळी महाराजांचे स्वागत डॉ. राजेंद्र भाऊ सानप यांनी केले. या किर्तनास ह भ प वैजीनाथ सानपसर, दिंगाबर कुंडलकर, इंद्रजित भंडारे, राजेंद्र घोलप, खेडकरसर यांच्यासह मृदंगाचार्य पवन ढाकणे, विणेकरी दादाहारी गिते यांनी साथ संगत केली. यावेळी एम डी पांचाळगुरूजी, ह भ प मोहन महाराज खरमाटे, उत्तमराव दोडके, आश्रुबा नागरगोजे, वसंतराव सानप, ग मा शहाणे, आर के भोंडवे, वाय एस भोंडवे, धनंजय सानप, ढाकणे यांच्यासह असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.





## एमटीएस आलिंपियाड राज्यस्तरीय स्पर्धेत वसंत प्राथमिक शाळेचे सुयश

केज । प्रतिनिधी

एमटीएस ऑलिंपियाड राज्यस्तरीय स्पर्धा परिक्षेत वसंत प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली चा विद्यार्थी चि.अवधूत राऊत हा राज्यातून तेरावा क्रमांकाने उतीर्ण झाला आहे. तसेच कु. शिवाणी तांदळे इयत्ता तिसरी सिल्व्हर मेडल, इयत्ता चौथी चि.अक्षय गिरी याने गोल्ड मेडल मिळवले आहे. त्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत देशमुखसह शिक्षक किरण अस्वले सर, विजय आरकडे सर, प्रविण देशमुख सर यांनी शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार करून सन्मानचिन्ह देण्यात आले आहे. याबद्दल पालकांनी संस्थेचे सचिव रमेशरावजी आडसकर आणि शिक्षक बांधवांचे आभार मानले आहेत.

## चिंचोलीमाळी येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

### २३ रोजी होणार महाप्रसादाने सांगता; संगीतमय भारुडाची मिळणार खास मेजवानी

केज । प्रतिनिधी

श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त मौजे चिंचोली माळी ता.केज जि.बीड येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्री संत सावता महाराज चरित्र ग्रंथ वाचन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे हे सप्ताहाचे ११ वे वर्ष असून, चिंचोली माळी गावाचे श्रद्धास्थान स्व. महंत ह.भ.प.रामकृष्ण महाराज वरपगावकर यांच्या स्मरणार्थ भक्ति भावाने साजरा होणार आहे. या सोहळ्याची सुरुवात बुधवार दि.१६ जुलै २०२५ (आषाढ कृष्ण ६) रोजी होणार असून, सांगता बुधवार दि.२३ जुलै २०२५ (आषाढ कृष्ण १४) रोजी महाप्रसादाने होणार आहे.

दररोज रात्री ८.०० वाजता श्री संत सावता महाराज जीवन चरित्र कथा वाचन होणार असून, विविध भागातील कीर्तनकार आपली किर्तन सेवा सादर करणार आहेत. दि.१६ जुलै रोजी ह.भ.प.महंत महादेव महाराज बोराडे दि.१७ जुलै रोजी ह.भ.प.महादेव महाराज राऊत, दि.१८ जुलै रोजी ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली महाराज, दि.१९ जुलै रोजी ह.भ.प.प्रकाश महाराज साठे, दि.२० जुलै रोजी ह.भ.प. सुमंत महाराज डाके, दि.२१ जुलै रोजी ह.भ.प. प्रणिताताई गवारे, दि.२२ जुलै रोजी ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे, दि.२३ जुलै रोजी ह.भ.प.भगवान महाराज शास्त्री शिवराम पुरी मठ संस्थान, वरपगांव यांचे किर्तन होणार आहे. या सप्ताहातील खास कार्यक्रम रविवार दि.२० जुलै २०२५ रोजी रात्री ९.३० ते १२.३० या वेळेत आळंदी देवाची, पुणे येथील भारुड सम्राट ह.भ.प. गोविंद महाराज गायकवाड यांचे सोंगी सांप्रदायिक भारुड सादर होणार आहे.

बुधवार, दि.२३ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता ह.भ.प.भगवान महाराज शास्त्री यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर गावातील सर्व भाविकांसाठी महा प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये संगीत व मृदंग वादनातील सहभागामध्ये संगीत विशारद ह.भ.प.सुमंत महाराज डाके, बाळु महाराज कोरडे हे उपस्थित राहणार आहेत तर गायनाचार्य संगीत अलंकार ह.भ.प. वैभव महाराज फुल झळके, तसेच मृदंगाचार्य ह.भ.प. विलास महाराज कोरडे माजलगाव हे उपस्थिती लावणार आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहा च्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन आणि सेवा गावातील कार्यकर्ते करत असून सर्व भाविकांनी या धार्मिक सोहळ्यात उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन अवॉर्ड २०२५ ने न्युयॉर्कमध्ये ॲड. वर्षाताई देशपांडे सन्मानित

बीड । प्रतिनिधी

युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन अवॉर्ड हा जागतिक पुरस्कार या पुर्वी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना १९८३ साली व जे.आर.डी. टाटा यांना १९९२ साली मिळाला होता. तब्बल ३३ वर्षाच्या प्रदिर्घ काळानंतर हा पुरस्कार भारताला ॲड. वर्षाताई देशपांडे यांच्या रूपाने मिळाला आहे. ही बाब समस्त भारतीयांसाठी अभिमानाची आणि सन्मानाची आहे असे लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे.

न्युयॉर्क मध्ये ॲड वर्षाताई देशपांडे यांच्या स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठीच्या व मुलींच्या जन्माचे स्वागत आणि मुलींच्या सक्षमीकरणासाठीच्या कामाची दखल घेऊन संयुक्त राष्ट्र लोकसंख्या संघटनेच्या वतीने सन्मानित करण्यात आले. आपणास कळविण्यात आम्हाला अत्यंत आनंद होतोय की, ॲड. वर्षाताई देशपांडे, सचिव, दलित महिला विकास मंडळ, सातारा तथा मुख्य प्रवर्तक, लेक लाडकी अभियान यांना संयुक्त राष्ट्रच्या 'युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन अवॉर्ड २०२५' या पुरस्काराने पुरस्कृत व्यक्ती म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. 'युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन अवॉर्ड' हा पुरस्कार दरवर्षी संयुक्त राष्ट्रसंघातर्फे 'लोकसंख्या आणि प्रजनन आरोग्य क्षेत्रात' अत्युत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना दिला जातो. १९८३ पासून या पुरस्काराची स्थापना संयुक्त राष्ट्र महासभेने केली असून, जागतिक स्तरावर दिला जाणारा हा एक अत्यंत मानाचा पुरस्कार आहे.



ॲड. वर्षाताई देशपांडे यांना हा पुरस्कार लिंगभेदाच्या आधारे होणाऱ्या गर्भलिंग निवडीविरोधातील त्यांच्या संघर्षासाठी दिला गेला आहे. या कार्यामध्ये त्यांनी क्षमतावाढ, जनजागृती, कायदेशीर कारवाई आणि समुदाय सहभाग या सर्व स्तरांवर भरीव कामगिरी केली आहे म्हणूनच वर्षाताई यांना गौरविण्यात आले आहे. याआधी हा पुरस्कार आपल्या देशाला वैयक्तिक श्रेणीत आयर्न लेडी इंदिरा गांधी (१९८३) आणि जगप्रसिध्द उद्योजक जे.आर.डी. टाटा (१९९२) यांच्या माध्यमातून मिळाला आहे. तसेच या वर्षी ॲड. वर्षाताई देशपांडे यांना हा पुरस्कार ११ जुलै २०२५ रोजी न्यूयॉर्क येथे प्रदान करण्यात आला आहे. ॲड. वर्षाताई देशपांडे, सचिव, दलित महिला विकास मंडळ, सातारा तथा मुख्य प्रवर्तक लेक लाडकी अभियान यांची संयुक्त राष्ट्रांच्या 'युएन पॉप्युलेशन अवॉर्ड २०२५' साठी पुरस्कृत व्यक्ती म्हणून निवड झाली आहे.

बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील बालविवाह थांबून त्या मुलींना परत शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना विविध कौशल्यांची प्रशिक्षणे दिली आहेत. त्या मुली स्वयंपूर्ण होतील, स्वतःच्या पायावर उभ्या राहतील यासाठी वर्षाताईनी केलेलं काम खूप मोलाचं आहे. तसेच कमी होणाऱ्या मुलींच्या संख्येबाबत त्यांनी केलेले काम, दिलेला न्यायालयीन लढा आणि जनसामान्यांची उभी केलेली लोकचळवळ तसेच महिलांचे पतीच्या बरोबरीने घर मिळकतीस मालक सदरी नाव लागण्याच्या संदर्भातील केलेले काम, लक्ष्मी मुक्ती अंतर्गत शेतजमिनीला महिलांना पतीच्या बरोबर सहमालकीन होण्यासाठी केलेले काम, दिलेला आत्मविश्वास हे ही महत्वपूर्ण ठरले.

ॲड. वर्षाताई देशपांडे यांना हा पुरस्कार लिंगभेदाच्या आधारे होणाऱ्या गर्भलिंग निवडीविरोधातील त्यांच्या संघर्षासाठी दिला जात आहे. या कार्यामध्ये त्यांनी क्षमतावाढ, जनजागृती, कायदेशीर कारवाई आणि समुदाय सहभाग या सर्व स्तरांवर भरीव कामगिरी केली आहे. हा पुरस्कार ११ जुलै २०२५ रोजी न्यूयॉर्क येथे प्रदान करण्यात आला आहे. यावेळी ॲड. शैलजाताई जाधव, कैलास जाधव यांच्यासह दलित महिला विकास मंडळ, सातारा चे पदाधिकारी मंडळींची उपस्थिती होती. वर्षाताई देशपांडे यांना मिळालेला हा जागतिक स्तरावरील युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन अवॉर्ड २०२५ पुरस्कार म्हणजे महाराष्ट्र राज्यातील महिला व मुलींचा सन्मान आहे असे बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे.

# आडे वस्तीवरील नागरिकांची पाण्यासाठी वणवण भटकंती!

## ■ सरपंच महोदय, महिलांना पाण्यासाठी होणारा त्रास थांबवा आणि त्यांच्या वेदना पाहा ओ?

## ■ वस्तीवरील महिलांचा संतप्त सवाल : आम्हीच नेहमी त्रास सहन करायचा का?

गेवराई । प्रतिनिधी

भोजगाव-कोमलवाडी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या आडे वस्तीतील नागरिकांना आजही मूलभूत गरज असलेल्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. रोज सकाळी महिलांची पाण्यासाठी होणारी धावपळ हृदयद्रावक चित्र निर्माण करत आहे. महिलांसह नागरिकांना पाण्यासाठी लांब-लांब जावे लागत आहे. डोक्यावर हंडा घेऊन पाणी आणावे लागते, त्यामुळे घरगुती कामांवरही परिणाम होत आहे.

ग्रामपंचायतीकडून यावर कोणताही ठोस उपाय करण्यात आलेला नाही. केवळ आश्वासनेच मिळत आहेत. वारंवार तक्रारी करूनही पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही. केवळ आश्वासनांवरच वेळ मारून नेली जात आहे. यामुळे संतप्त नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. पाणी हा आमचा हक्क आहे, दया नाही, अशा शब्दांत स्थानिक महिलांनी आपला संताप व्यक्त केला. दररोज सकाळी उठून महिलांना पाण्याच्या हाकारीसाठी दूरदूरच्या विहिरीकडे जावे लागते. या गंभीर प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने उपाययोजना कराव्यात, ही नागरिकांची जोरदार मागणी आहे.



### भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सरपंच काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचे लक्ष!

शासकीय विहिरीचे पाणी अचानक कमी झाल्याने निर्माण झालेल्या भीषण पाणीटंचाईने संपूर्ण वस्ती त्रस्त झाली असताना, आता या गंभीर परिस्थितीत सरपंच काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून वस्तीतील नागरिकांना पाण्यासाठी प्रचंड हाल सोसावे लागत आहेत. तसेच पर्यायी उपाययोजनांचा अभाव यामुळे महिलांची व वृद्धांची अक्षरशः धावपळ सुरू आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीचे सरपंच आता या संकटावर कोणती ठोस भूमिका घेतात? तातडीने टँकर वाढविणार का? की दुसऱ्या जलस्त्रोताची व्यवस्था करणार? यावरच वस्तीतील नागरिकांचे भवितव्य अवलंबून आहे.

### शासकीय विहिरीचे पाणी अचानक कमी; आडे वस्तीला भीषण पाणीटंचाईचा फटका!

वस्तीला पाणीपुरवठा करणाऱ्या शासकीय विहीरीतील पाणीसाठा अचानक कमी झाल्याने आडे वस्तीतील नागरिकांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. आधीच अपुरा पाणीपुरवठा असलेल्या या भागात आता परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे. या विहिरीवर संपूर्ण वस्तीचा पाणीपुरवठा अवलंबून होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून विहीरीचे पाणी झपाट्याने कमी होत असल्याने पाणी मिळणेही कठीण झाले आहे. दिवसेंदिवस परिस्थिती बिकट होत चालली आहे. महिलांना यामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन पर्यायी उपाययोजना कराव्यात, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

### पाण्यासाठी महिलांचा आक्रोश, आमचं जगणंच मरणाचं झालंय!

भीषण पाणीटंचाईमुळे महिलांचा त्रास आता असह्य झाला असून, पाण्यासाठीचा त्यांचा आक्रोश हृदय हेलावणारा आहे. दररोजच्या या पायपीटीने आमचं आरोग्य, कुटुंब आणि आयुष्यच उद्ध्वस्त झालं आहे. असा संताप आणि वेदनेचा सूर महिलांनी व्यक्त केला. पायी चालून पाणी आणणं, आणि मिळणाऱ्या अपुऱ्या पाण्यावर घर चालवणं हे महिलांचे रोजचे वास्तव बनले आहे. पुरुष बाहेर जातात, पण घर चालवायचं म्हणजे आम्हालाच हे सगळं सहन करावं लागतं, असा महिलांचा आक्रोश ऐकायला मिळत आहे. ग्रामपंचायतीकडून आणि सरपंचांकडून अद्याप ठोस उपाययोजना न झाल्याने महिलांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. आता आंदोलनाशिवाय पर्याय नाही, असा इशाराही महिलांनी दिला.

# लिंबागणेशमध्ये शिवम मशीनरी अँड इलेक्ट्रिकल्स दुकान फोडून साडे पाच ते सहा लाखांचा ऐवज चोरीला

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील श्रीराम पाठक यांच्या मालकीच्या शिवम मशीनरी अँड इलेक्ट्रिकल्स या दुकानात बुधवारी रात्री चोरीची घटना घडली.



श्रीराम पाठक हे काल गेवराई येथे नातेवाईकांच्या लग्नास गेल्यामुळे दुकान दिवसभर बंद होते. गुरुवारी सकाळी अशोक वायभट यांनी फोन करून दुकानाचे शटर तुटले असल्याची माहिती पाठक यांना दिली. त्यांनी तात्काळ दुकानात धाव घेतली असता, चोरट्यांनी दुकानाचे शटर तोडून आत प्रवेश करून वायंडिंग वायर, स्क्रॅप यासह एकूण अंदाजे ५.५ ते ६ लाख रुपयांचा माल लंपास केल्याचे समोर आले. तसेच दुकानातील गल्ला फोडून त्यामधील ५ ते ६ हजार रुपये चोरीला गेल्याची माहिती श्रीराम पाठक यांनी दिली.

घटनेची माहिती मिळताच नेकनूर पोलीस ठाण्याचे पोउनि. अप्पासाहेब रोकडे, पो. विशाल क्षीरसागर तसेच लिंबागणेश पोलीस चौकीचे स.फौ. बाबासाहेब राख, गोविंद बडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या चोरीप्रकरणी सपोनि. चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# दर्गा नासरजंग इनाम जमीन प्रकरणी चौकशी करून गुन्हे दाखल करा

## अन्यथा बेमुदत आमरण उपोषण करु : सय्यद सलीम बापू

बीड । प्रतिनिधी

परळी येथील ऐतिहासिक दर्गा नासरजंग देवस्थान इनामी जमिनी प्रकरणी लवकरात लवकर समितीमार्फत चौकशी करून गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी आंबेडकरी विचार मोर्चा तथा आंबेडकर रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी केली आहे. मौजे शिवार परळी ता.परळी बीड येथील सर्वे नंबर ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, २४०, २५९, ३०३, ३०४, ३८८, ३९५, ३९८ व ३९९ हे सर्व सर्वे नंबर येथील ऐतिहासिक दर्गा नासरजंगची देवस्थान खिदमत माश एकूण १७८ एकर इनामी जमीन असून वरील सर्व सर्वे मध्ये खुलेआम अवैध प्रकारे खरेदी - विक्री करून तलाठी, तहसीलदार, दुय्यम निबंधक न.प. परळी व भूमी अभिलेख येथील कर्मचारी यांच्या संगनमताने चुकीचे सर्वे करून पी.टी.आर व पी.आर कार्डही सुद्धा देण्यात आली आहे.



परळी नगरपरिषद आणि भूमी अभिलेख येथील अधिकारी व कर्मचारी यांनी स्थानिक नेते भूमाफिया यांच्याशी संगणमत करून वर्ग दोन च्या देवस्थान इनामी जमिनी अवैधरीत्या वैद्य करण्याचे कारभार करीत आहे. वरील जमिनीवर कसलीही कायदेशीर परवानगी न घेता अनधिकृतपाने बांधकाम केले जात आहे ते थांबवण्यासाठी आम्ही वेळोवेळी शासन दरबारी निवेदने दिली असून त्या निवेदनावरून अद्याप अवैध बांधकाम करणाऱ्यांवर कसलेही कार्यवाही करण्यात आली नाही.

तरी वरील ऐतिहासिक दर्गा नासर जंग देवस्थान इनाम जमिनी प्रकरणी विशेष चौकशी समितीमार्फत चौकशी करून देवस्थान दर्गा नासरजंग जमिनीची अवैध खरेदी-विक्री करणाऱ्यांवर व देवस्थान इनाम जमिनीवर अवैध बांधकाम करणाऱ्या दोषींवर वक्फ अधिनियम १९९५ कलम ५२ (१) (अ) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात यावे अन्यथा येत्या १६ जुलै बुधवार रोजी सकाळी ११:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर आंबेडकरी विचार मोर्चा च्या वतीने लोकशाही मार्गाने बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल असे असे आंबेडकरी विचार मोर्चाचे तथा आंबेडकर रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# कातकरी आदिवासी मजूर आणि त्यांच्या मुलांची बेठबिगारीतून मुक्तता

दौलावडगाव । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील गहूखेल तांडा येथे पुणे, रायगड, पालघर या जिल्ह्यातील आदिवासी कातकरी कोळसा भट्टीवर काम करणाऱ्या मजुरांना आगाऊ रक्कम देऊन कोळसा भट्टी कामासाठी बांधून घेतले, अडकवून ठेवले आणि त्यांच्या मुलांनाही दुसरीकडे कुठेही कामाला जाऊ दिलेले नाही त्यांच्या लहान मुलांकडूनही जबरदस्तीने घर काम करून घेतले याची माहिती प्राप्त होताच विवेक पंडित संस्थापक असलेल्या श्रमजीवी संघटना महाराष्ट्र यांच्यावतीने तहसीलदार आष्टी यांचेकडे निवेदन देऊन या बेठबिगारांची मुक्तता केली आहे.

आष्टी तालुक्यातील गहूखेल तांडा येथील कोळसा भट्टी मालक किशोर राठोड, दिलीप राठोड, रमेश राठोड यांचेकडे बेठबिगारी करत असलेले मजूर लक्ष्मण श्रावण वाघमारे यांनी सांगितल्याप्रमाणे विकास विष्णू मोरे, बारकीबाई विकास मोरे रा.मुळखेड (ता.मुळशी जि.पुणे) रघुनाथ रमेश पवार, वनिता रघुनाथ पवार रा.माणगाव ता.पौड जि.पुणे, गणेश पांडुरंग घोगरे, मनीषा गणेश घोगरे (रा.कडबा ता.मावळ जि.पुणे), फुलचंद लक्ष्मण वाघमारे, शैलाबाई फुलचंद वाघमारे रा.ढोरे मरवंडे (ता.मावळ जि.पुणे) काळुराम बबन वाघमारे, इंदुबाई काळुराम वाघमारे (रा. कोळवाडी ता. मावळ जि.पुणे), संगीता हरिश्चंद्र वाघमारे रा.गंगवाडी (ता.पेण जि.रायगड) वनिता महादेव पवार, ताराबाई संतोष वाघमारे, महादेव पांडुरंग पवार, लक्ष्मण श्रावण वाघमारे, लहान महादू वाघमारे, संतोष चंदर वाघमारे, गुलाबबाई लक्ष्मण वाघमारे, राजश्री गणेश मांडवकर असे एकूण २६ स्त्री आणि पुरुष यांना आज सायंकाळी



मुक्त करण्यात आले.

हे मजूर हे गहूखेल तांडा येथे मजुरी करत होते. हे सर्व मजूरांचे जवाब घेऊन त्यांना मुक्तीचे दाखले द्यावे आणि कायदेशीर गुन्हे दाखल करण्यात यावेत असे निवेदन सरचिटणीस बाळाराम भोईर यांनी आज आष्टी तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांना दिले आहे. गहूखेल तांड्यावर आणखी काही अडकलेल्या वेठबिगार मजुरांची देखील आम्ही तात्काळ सुटका करणारा असल्याचेही प्रबोधन निकाळजे यांनी निवेदनाव्दारे म्हटले आहे. श्रमजीवी संघटनेचे राज्य सरचिटणीस बाळाराम भोइर आणि इतर यांनी आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण पाटील हनपुडे यांची भेट घेतली असता या गुन्ह्यात मानव तस्करीचे कलम जोडले गेले आहे आणि ८ लोकांचे देखील आम्ही जबाब नोंदवून घेणार आहोत असे सांगितले.

# आ. सुरेश धस यांनी घेतली शेळके कुटूंबीयांची भेट

आष्टी । प्रतिनिधी



अहिल्यानगर-पुणे महामार्गावर जातेगाव फाटा शिवारात आमदार सुरेश धस यांच्या मुलाच्या कारची धडक बसून, दुचाकीवरील हॉटेल व्यावसायिकाचा मृत्यू झाला. त्यानंतर या अपघाताचे सोशल मिडियावर विरोधकांनी भांडवल करत आगडोंब उठविला होता. हा अपघात आहे त्यावर पोलिस सविस्तर तपास करतील असे सांगत शुक्रवार (दि.११) रोजी सायंकाळी विधानसभेचे अधिवेशन आटोपून आष्टीकडे येताना आमदार सुरेश धस हे मयत नितीन शेळके यांच्या घरी जाऊन भेट झालेल्या दुर्दैव घटनेबद्दल खंत व्यक्त करत कुटुंबियांना धीर दिला.

सोमवारी (७ जुलै) रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास हा अपघात झाला. नितीन प्रकाश शेळके (३४, रा.पळवे खुर्द, ता.पारनेर) असे मृत दुचाकीस्वाराचे नाव होते. अपघात झाल्यानंतर आमदार सुरेश धस यांचे पुत्र स्वतः सागर धस हे जखमीला दवाखान्यात घेऊन गेले व उपचार करण्यास सांगितले परंतु दुर्दैवाने नितीन यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेचा सोशल मिडीयावर विरोधकांनी ट्रोल करत आरोपांची लाखोळी केली. यानंतर स्वतः आमदार सुरेश धस यांनी मिडीयासमोर येऊन या अपघाताची संपुर्ण चौकशी करा, माझ्या मुलांच्या रक्ताचे नमुनेही तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवा यात मी कसलाही सहभाग घेणार नाही हे जाहीर करत पोलिसांनी योग्य तो तपास करावा अशी सुचनाही धस यांनी दिली. त्यानंतर अधिवेशन आटोपून ते आष्टीकडे येत असताना मयत नितीन शेळके यांच्या घरी जाऊन भेट झालेल्या दुर्दैव घटनेबद्दल खंत व्यक्त करत कुटुंबियांना धिर दिला.

# कर्मवीर एकनाथ आवाड यांनी मिळवून दिलेल्या गायरान जमीनीच्या न्याय हक्कासाठी उपस्थित रहा : उमेश आवाड

माजलगाव । प्रतिनिधी

हजारो दिन दलित गोर गरीब ऊसतोड मजूर कष्टकऱ्यांना अठरापगड जातीतील मांग महार ढोर चांभार मराठा वंजारी पारधी भिल्ल समाज बांधवाना स्व. कर्मवीर अ‍ॅड. एकनाथ आव्हाड यांनी मिळून दिली पण ती जमीन आता शासन परत घेण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे स्वर्गीय एकनाथ आव्हाड यांच्या विचाराचा वारसा जपण्याची गरज आहे आणि आपण सर्वांनी एकत्र येत जिजांनी दिलेला जमिनीचं संरक्षण करण्यासाठी रस्त्यावर उतरणे गरजेचे आहे असे प्रतिपादन मानवी हक्क अभियानचे युवा नेते उमेश आवाड यांनी केले आहे.



माजलगाव तालुक्यातील उपविभागीय कार्यालय या ठिकाणी दि.१४.७.२०२५. वार सोमवार ठीक १२:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते माजलगाव उपविभागीय कार्यालय असा मानवी हक्क अभियान च्या वतीने विविध मागण्या घेऊन इशारा मोर्चा होणार आहे. मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलिंद नाना आव्हाड यांच्या उपस्थिती मध्ये गायरान धारकांच्या विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाचे नेतृत्व मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलिंद नाना आवाड करणार आहेत. या मोर्चाला माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी आणि गायरान धारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान मानवी हक्क अभियानचे युवा नेते उमेश आवाड यांनी केले आहे.

# अपहरण झालेल्या सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी सिरसट यांना ऊसतोड मुकादम आणि गुंडाकडून बेदम मारहाण!

## मारहाणीत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट गंभीर जखमी; जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू

बीड । प्रतिनिधी

बाराशे रुपयासाठी ऊसतोड कामगाराचे मुकादमाने अपहरण केल्याची माहिती मिळताच सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना ऊसतोड मुकादम आणि त्याच्या साथीदारानीन बेदम मारहाण केल्याची घटना काल शुक्रवार दिनांक ११ रोजी माजलगाव तालुक्यातील लऊळ गावात घडली. या घटनेमध्ये सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी राजाराम सिरसट यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली असुन याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या घटनेने जिल्ह्यामध्ये एकच खळबळ उडाली.

याबाबत अधिक माहिती अशी की, माजलगाव तालुक्यातील किट्टीआडगाव येथील रहिवासी असलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांच्याकडे शेतात काम करण्यासाठी असणारा शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे ऊसतोड मुकादम शेख राजू शेख बाबू रा. मंजरथ ता. माजलगाव जि.बीड याचे बाराशे रुपये देणे होते. या बाराशे रुपयांसाठी या मुकादमाने व त्याच्या साथीदारांनी शेतगडी विश्वनाथ पंडित यांचे शुक्रवार दि. ११ रोजी सकाळी दहा वाजता अपहरण केले. त्यानंतर त्याला मारहाण करायला सुरुवात केली. त्याने स्वतःचा बचाव करण्यासाठी शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना फोन करून मारहाण होत असल्याची माहिती दिली. सदर प्रकरणाची माहिती मिळताच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी संबंधित मुकादमा कडे फोनवरून शेतगड्याकडील पैशासंदर्भात विचारले असता मुकादमाने शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे दीड लाख रुपये आहेत. दीड लाख रुपये द्या आणि शेतगड्याला घेऊन जा असे सांगितले. त्यामुळे राजाराम सिरसट यांनी दीड लाख रुपये दिल्यास तुम्ही माझ्या शेतगड्याला सोडणार का? असे विचारताच त्यांनी पैसे घेऊन या त्याला सोडतो असे सांगितले. त्यानंतर राजाराम सिरसट यांनी घरी जाऊन दीड लाख रुपये घेतले व मुकादमाने सांगितलेल्या ठिकाणी गेले. यावेळी शेत गड्याने दीड लाख रुपये देऊ नका असे सांगितले. त्यामुळे मुकादम शेख राजू शेख बाबू आणि त्याच्या साथीदारानी शेत गड्यासह शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली.

दरम्यान लाठ्या-काठ्या, कुऱ्हाड आणि गुप्ती अशी धारदार शस्त्रे घेऊन झाडीमध्ये लपून बसलेल्या दहा-बारा जणांनी बाहेर येत शेतगडी आणि शेतमालक राजाराम सिरसट यांना मारहाण करायला सुरुवात केली. यावेळी मुकादमाने त्याच्या जवळ असलेल्या रिव्हॉल्वरचा धाक दाखवून पुन्हा मारहाण करायला सुरुवात केली असता पोलीस खात्यातील कैशल्याचा वापर करून राजाराम सिरसट यांनी शिताफिने मुकादमा जवळील रिव्हॉल्वरचा ताबा घेतला. परंतु सदर



रिव्हॉल्वर मध्ये बुलेट नाहीत हे मुकादम आणि त्याच्या साथीदारांना माहित असल्यामुळे आपल्याला काही धोका नाही हे सर्वांना ज्ञात होते. त्यामुळे सर्वांनी असुरी हसत पुन्हा जबर मारहाण करायला सुरुवात केली. या मारहाणीत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट गंभीर जखमी झाले.

या गंभीर जखमी अवस्थेत राजाराम सिरसट यांना जबरदस्ती मोटरसायकलवर बसवून माजलगाव तालुक्यातील ढोरगाव आणि लवूळ शिवारातील घनदाट असलेल्या जंगलात घेऊन जाऊन पुन्हा मारहाण करायला सुरुवात केली. यावेळी सदरील मुकादम आणि त्याच्या साथीदारांनी राजाराम सिरसट यांच्या जवळील दीड लाख रुपये हिसकावून घेत बेदम मारहाण केली. या मारहाणी मध्ये राजाराम सिरसट यांच्या घशाला कोरड पडल्यामुळे त्यांनी मुकादम आणि मारहाण करणाऱ्यांकडे मला मारू नका, मी मरेन, मला पाणी द्या अशी विनंती करून पिण्यासाठी पाणी मागितले असता या गुंडांनी त्यांच्या तोंडावर लघुशंका केली. यावर हे लोक थांबले नाहीत यांनी त्यांच्या कानात नको ती कृती करण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान आपल्या साहेबासोबत अमानुष कृत्य करत आहेत आणि बेदम मारहाण करत आहेत हे पाहून घाबरलेला शेतगडी त्या ठिकाणाहून पळून गेले व त्यांनी राजाराम सिरसट यांच्या मुलाला फोन करून मुकादम आणि त्याचे साथीदार जबर मारहाण करत आहेत. तुम्ही ताबडतोब या असे फोन द्वारे सांगितले. आपल्या वडिलांना मारहाण होत असल्याचे समजताच राजाराम सिरसट यांचा मुलगा विजयकुमार सिरसट यांनी वडीलांना फोनवरून संपर्क साधला असता मुकादम व त्याच्या साथीदारांनी राजाराम सिरसट यांना कोणाचा फोन आहे असे म्हणत फोन उचलण्यासाठी सांगितले. त्यावेळी राजाराम सिरसट यांनी आपल्या मुलाला फोनवरून मला लऊळ गावातील सैलानी बाबा परिसरात मुकादम आणि त्याचे काही साथीदार मारहाण करत आहेत ताबडतोब ये असं निरोप दिला. आपल्या वडिलांना मारहाण होत असल्याने विजयकुमार सिरसट मित्रांना घेऊन वडिलांना वाचवण्यासाठी घटनास्थळी पोहोचले. यावेळी राजाराम सिरसट यांचा मुलगा आणि त्याचे मित्र येत असल्याचे पाहून मुकादम व त्याच्या गुंडांनी गंभीर जखमी झालेल्या राजाराम सिरसट यांना पुन्हा गाडीवर बसवून घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला.

यावेळी रस्त्यावर चिखल असल्याने मोटारसायकल चिखलात स्लिप झाली व मोटारसायकलवरील तिघे खाली पडले. त्यावेळी राजाराम सिरसट यांचा मुलगा व त्याचे मित्र घटनास्थळी येताच मारहाण करणारे गुंड पळून गेले. दरम्यान या वेळी मारहाण करणाऱ्या मुकादमाला विजयकुमार सिरसट यांच्या मित्रांनी पकडून माजलगाव पोलीस ठाण्यात आणले. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी मारहाण करणाऱ्या मुकादम आणि त्याच्या साथीदाराच्या विरोधात तक्रार दिली असून आज शनिवार दिनांक १२ रोजी सायंकाळी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या मारहाणीत राजाराम सिरसट हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बीड येथील जिल्हा रुग्णालय उपचार सुरू आहेत. किरकोळ पैशासाठी मुकादम आणि त्याच्या साथीदारांकडून सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्यांना अमानुष आणि गंभीर मारहाण होते हे बाब अतिशय गंभीर आणि अमानवी आहे. या घटनेने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT